झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/साप्रा-२/झोपुआ/भांबुर्डा/१२६/२०२४
दिनांक :-१९/०१/२०२४

"जाहिर नोटीस"
(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

प्रस्तावना-

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे "उक्त अधिनियम" असा करणेत आला आहे) चे कलम ३ अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. आणि;

१) ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करण्यात आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आणि;

२) ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचे या कार्यालयाचे नियोजन आहे. आणि;

३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे ३२८८.०० चौ.मी. इतके क्षेत्र हे महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१६ ऑगस्ट १९७३ मध्ये पान क्र.१७०६ वर गलिच्छ वस्ती म्हणून घोषीत करण्यात असल्याचे दिसून येते व त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार ३२७७.३९ चौ.मी.इतके आहे, असे उपअधिक्षक भूमी अभिलेख, झोपुप्रा, पुणे यांनी दि.१८/०१/२०२४ रोजीच्या अहवालाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सदर योजनेकरीता वरीलपैकी कमीत कमी ३२७७.३९ चौ.मी इतके क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे. आणि;

४) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील" असे नमूद केले आहे. आणि;

५) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत. आणि,

६) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्याचे प्रस्तावित असून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचिमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने व ती महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये घोषीत असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

(२) अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- फा.प्लॉ.नं.३४६, दीप बंगला चौक जवळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव- भांबुर्डा, पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| फा.प्लॉ.नं.३४६ | खाजगी | ३२७७.३९ चौ.मी. | रस्ता | फा.प्लॉ.नं. ३४७ ते ३४९ | फा.प्लॉ.नं. ३४५ | फा.प्लॉ.नं: ३७२ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १८ / ०७ /२०२४

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर.
२. जमीन मालक मे.ग्रॅप शेल्टर्स तर्फे प्रमोद धाडीवाल आणि पुष्कराज सुरेश केंजळे - ११८४/४, एफ.सी. रोड,गोकुळनगर,ज्ञानेश्वर पादुका चौक, शिवाजीनगर,पुणे ४११००५ - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.